# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ)

## (महाविद्यालयीन विभाग)

डॉ. एस.एम.रोकडे
संचालक (प्रभारी)

जा.क्र./महा.वि./गो.वि./२९३/२०१५
दिनांक : ११/०३/२०१५

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय :– भारत देशाचे राष्ट्रगीत सर्व महाविद्यालय व शासकिय कार्यालयांमध्ये म्हटले जावे असा आदेश देण्याबाबत...

संदर्भ :– १.संकिर्ण १११४/पं.क्र. ४०४/विशि–३ दि. २६ नोव्हेंबर, २०१४ प्राप्त दि. ५/२/२०१५

२. युएनआय/एस/संकिर्ण–सर्व अकृणवि./(११/१५)/विशि–१/१०४७ दि. २ फेब्रुवारी, २०१५ प्राप्त दि. १६/२/२०१५

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये असणांस कळविण्यात येते की, मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या पत्राची प्रत सोबत जोडलेली असून कृपया त्या अनुषंगाने कार्यवाही घ्यावी.

ही विनंती

डॉ. एस.एम.रोकडे
संचालक (प्रभारी)
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी:–

१. मा. सहसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग नागपूर
२. मा. स्नेहा न. जोशी, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मादाम काम रोड, हुतात्मा राजगुरू चौक मंत्रालय, मुबई ४००० ०३२

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५
फोन नंबर ०७१३२–२१६५९४ **E-Mail** : arcollegesectiongug48@gmail.com

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.

Web: www.dhepune.gov.in E-mail- dhepune@yahoo.co.in

फोन नंबर- ०२०/ २६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नंबर- ०२०/२६१११११५३,


क्रमांक- युएनआय/एस/संकीर्ण-सर्व अकृ.वि./(११/१५)/विशि-१ /1047 दिनांक- ०२/०२/२०१५

प्रति,

- 2 FEB 2015

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे.

**विषय - भारत देशाचे राष्ट्रगीत सर्व महाविद्यालय व शासकीय कार्यालयांमध्ये म्हटले जावे असा आदेश देणेबाबत.**

संदर्भ - शासन पत्र क्रमांक : संकीर्ण१११४/प्र.क्र.४०४/विशि-३ दिनांक - २६.११.२०१४

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, सदर संदर्भिय पत्र शासनाने आपणास पाठवले असून सदर पत्राची प्रत या संचालनालयास कार्यवाहीस्तव पृष्ठांकित केलेली आहे.

सदर पत्राद्वारे शासनाद्वारे आपणास सदर विषयाबाबत जिल्हाध्यक्ष, रिपब्लिकन विद्यार्थी सेना यांनी मा. मंत्री (उ.व.तं.शि.) यांना सादर केलेल्या निवेदनामधील शाळेत रोज होणारे राष्ट्रगीत महाविद्यालयातही म्हटले जावे तसेच सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयामध्ये कार्यालयीन कामकाजाच्या प्रत्येक दिवशी राष्ट्रगीत म्हणण्यात यावे या अनुषंगाने कार्यवाही करण्याचे आणि आपल्या विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांना ही सदर प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सुचना देण्याचे कळविण्यात आले आहे. तसेच आपण केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने संबंधितांना परस्पर कळवून त्याबाबत शासनास अवगत करण्याचे कळविले आहे.

त्या अनुषंगाने आपणास या संचालनालयाद्वारे शासनाने आपणास पाठविलेल्या संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करुन संबंधितांना परस्पर कळविण्यात यावे आणि आपल्या विद्यापीठामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करण्यात यावे.

शिक्षण संचालक,(उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, पुणे-१,
यांचेकरिता.

प्रत- स्नेहा नु. जोशी, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.

**महाराष्ट्र शासन**

क्र.संकीर्ण१११४/प्र.क्र. ४०४/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक - २६ नोव्हेंबर, २०१४.

२२६ 08102194

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.

224 6/2/15
6559 5/2/15

**विषय** -- भारत देशाचे राष्ट्रगीत सर्व महाविद्यालय व शासकीय कार्यालयांमध्ये म्हटले जावे असा आदेश देणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भात जिल्हाध्यक्ष, रिपब्लिकन विद्यार्थी सेना यांनी मा. मंत्री (उ.व तं. शि.) यांना सादर केलेल्या निवेदनाची प्रत जोडली आहे.

२. सदर निवेदनाच्या अनुषंगाने आपल्या विद्यापीठामार्फत आवश्यक ती कार्यवाही करावी आणि आपल्या विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांना सदर प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात याव्यात. तसेच सदर प्रकरणी आपल्या विद्यापीठामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने संबंधितांना परस्पर कळवून त्याबाबत शासनास अवगत करावे ही विनंती.

आपली विश्वासु,

( स्नेहा न. जोशी )
कक्ष अधिकारी

प्रत,

१) संचालक,उच्च शिक्षण, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

२) श्री.सचिन निकम, जिल्हाध्यक्ष(औरंगाबाद), रिपब्लिकन विद्यार्थी सेना, निसर्ग कॉलनी, पेठे नगर, भावसिंगपूरा, औरंगाबाद यांना त्यांच्या दि. २२.७.२०१४ च्या पत्राच्या अनुषंगाने माहितीस्तव अग्रेषित.